महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण.
चव्हाणनगर पाषाण रोड, पुणे -411008
दुरध्वनी क्रमांक-020- 25657878 फॅक्स क्रमांक-020-25674641
ई मेल- sp.pune.r @maha.gov.in.

-: उमेदवारांना महत्वाची सूचना :-

पुणे ग्रामीण पोलीस शिपाई चालक भरती २०२४-२५ लेखी परीक्षेची सुधारीत उत्तरतालिका व लेखी परिक्षेत मिळालेले गुण

(Model Answer Key)

पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक संवर्गातील ०३ रिक्त पदांकरीता पोलीस शिपाई चालक भरती २०२४-२५ प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. त्यामध्ये मैदानी चाचणीमधून लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या ६३ उमेदवारांची लेखी परीक्षा दि.०५.०४.२०२६ रोजी पोलीस अधीक्षक, कार्यालय पुणे ग्रामीण भिमाशंकर हॉल, चव्हाण नगर पाषाण रोड,पुणे-४११००८ येथे घेण्यात आली आहे. त्यानुसार या कार्यालयाच्या संकेतस्थळावर दिनांक ०५.०४.२०२६ रोजी लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका संच A, B, C व D यांची उत्तरतालिका संच A, B, C व D (Model Answer Key) तयार करुन प्रसिध्द करण्यात आलेली होती.

तथापि, काही उमेदवारांनी आक्षेप घेतल्याने सदर लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका संच A, B, C व D ची सुधारीत उत्तरतालिका संच A, B, C व D (Model Answer Key) तयार करुन त्यानुसार उमेदवारांना लेखी परिक्षेत मिळालेले गुण पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण कार्यालयाच्या **www.puneruralpolice.gov.in** या संकेतस्थळावर आणि पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाच्या **www.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीस्तव प्रसिध्द करण्यात येत आहे. (उत्तरतालिका (Model Answer Key) चा आक्षेप कालावधी समाप्त झालेला असल्याने, यानंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.)

सदर यादीतील उमेदवारांनी आपणास लेखी परिक्षेमध्ये प्राप्त गुणांची पडताळणी करुन त्याबाबत काही हरकती किंवा आक्षेप असल्यास, त्यांनी त्यांचे आक्षेप दिनांक ०८.०४.२०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत या कार्यालयाच्या पोलीस भरती समाधान कक्ष, व्हाट्सअप मोबाईल क्र.८६६९६०३१३१ पाठविण्याबाबत कळविण्यात आलेले होते. परंतु तंत्रिक कारणामुळे तो मोबाईल क्र.८६६९६०३१३१ हा बंद असल्याने त्या मोबाईल क्र. ऐवजी नविन मोबाईल क्र. ९२७२५०४३५५ वर उमेदवारांचे नव्याने आक्षेप/ हरकती दिनांक ०९.०४.२०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत पाठवाव्यात व ई-मेल आयडी sp.pune.r@mahapolice.gov.in यावर लेखी स्वरुपात सविस्तर नोंद करु शकतात. उमेदवारांने आक्षेप / हरकती घेतांना स्वत:चे संपूर्ण नाव, आवेदन अर्ज क्रमांक, चेस्ट क्रमांक व मोबाईल क्रमांक तसेच आक्षेप इत्यादी स्पष्ट नमूद करुन पाठवावेत.

ठिकाण :- पुणे ग्रामीण
दिनांक :- ०८.०४.२०२६

08/4/26

(दिलीप शिंदे)
पोलीस उप अधीक्षक, (मुख्यालय)
पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण.

Scanned with OKEN Scanner